दि. २८/०९/२०२६

# नोटीस

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये N+2 हा सत्रपूर्तता कालावधी संपुष्टात आलेल्या विधी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) प्रवेशित होऊन परीक्षेत बसण्यासाठीच्या परवानगी बाबत.

**संदर्भ :** मा.उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे दि.२१/०९/२०२६ रोजीचे परिपत्रक क्र.२०९ आणि २१०

उपरोक्त विषयांस अनुसरून संदर्भीय परिपत्रक क्र.२०९ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये N+2 हा सत्रपूर्तता कालावधी संपुष्टात आलेल्या विद्यार्थ्यांना UGC च्या मार्गदर्शक तत्वानुसार एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) प्रवेशित होऊन परीक्षेत बसण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच परिपत्रक क्र.२१० नुसार ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम वर्ष व अंतिम पूर्व वर्षात अनुशेष (बॅकलॉग) राहिला आहे अशाच विद्यार्थ्यांना पुर्नप्रवेश न देता फक्त एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) परीक्षेत बसण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील परिपत्रकांनुसार या महाविद्यालयतील पात्र विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि तुमच्या सर्व गुणपत्रिकांसह लवकरात-लवकर महाविद्यालयाशी संपर्क करून आपली पात्रता निश्चित करावी जेणेकरून अंतिम वर्षातील प्रवेश संबंधित सर्व प्रक्रिया पूर्ण करून विहित वेळेत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षा अर्ज भरता येईल.

Deccan Education Society's Shri Navalmal Firodia Law College, Pune-4

डॉ.सुनिता आढाव
प्राचार्या
प्राचार्या
डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे
श्री नवलमल फिरोदीया विधी महाविद्यालय
पुणे-४११००४.

सोबत : माहितीसाठी परिपत्रक क्र.२०९ आणि २१० च्या प्रती.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे- ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/Email :boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २०९ /२०२६

विषय: सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) प्रवेशित होण्यास व परीक्षेत बसण्यासाठी (N+2+1) परवानगी देण्याबाबत...

विद्यापीठ अधिकार मंडळाने परीक्षा विभागाकडून प्राप्त झालेल्या टिपणी संदर्भ क्र. १४९, दि. ११/०९/२०२६ बाबत घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांस या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये संबंधित अभ्यासक्रमाचा N+2 कालावधी पुर्ण केला आहे व शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये अंतिम वर्षात प्रवेशास पात्र आहेत, परंतु N+2 पुर्ण झाल्याने प्रवेशित नाहीत, अशा विद्यार्थ्यांना UGC च्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये अंतिम वर्षात प्रवेशाची संधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, संबंधित विद्यापीठीय शैक्षणिक विभाग/ संबंधित सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये/ संबंधित सर्व संलग्नित मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा व विद्यार्थी या संधीपासुन वंचित राहणार नाहीत याची काळजी घ्यावी महाविद्यालयांनी/संस्थांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज पुर्ण करण्याची काळजी घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११००७ )
जावक क्र. CB/34 )
दिनांक :21/09/2026 )

21/9/2026
(स. द. डावखर)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी:

१. मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र–कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठीय शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
११. मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान सेवा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१२. सहायक कुलसचिव, अहिल्यानगर व नाशिक विद्यापीठ उपकेंद्र

संदर्भ : टिपणी क्र. प्रन/२३४ दि. १५/०९/२०२६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे- ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/Email :boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २१० /२०२६

**विषय:** सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) परीक्षेत बसण्यासाठी परवानगी देण्याबाबत (अनुशेष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी).

विद्यापीठ अधिकार मंडळाने परीक्षा विभागाकडून प्राप्त झालेल्या टिपणी संदर्भ क्र. १५०, दि. ११/०९/२०२६ बाबत घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांस या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे कळविण्यात येते आहे.

१) ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम पूर्व वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे व ज्यांची सोडवणूक निश्चित केलेल्या विहीत कालावधीमध्ये पूर्ण होईल अशा सर्व विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी परीक्षेस बसण्यास संधी देण्याच्या दृष्टीने शेवटच्या दोन संधी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) देण्यात येणार आहेत. तथापि सदरची मुभा/सवलत ही फक्त अंतिम वर्ष व अंतिमपुर्व वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे अनुशेष (बॅकलॉग) राहीले असतील अशाच विद्यार्थ्यांना लागु राहील. या संधी अंतर्गत नवीन किंवा पुर्नप्रवेश देता येणार नाहीत.

२) हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७ परीक्षा आयोजित करतांना नियमित व अनुशेष विद्यार्थ्यांसाठी ज्या परीक्षा आयोजित केल्या जातात, तेवढयाच परीक्षा आयोजित करण्यात येतील व या परीक्षांना प्रविष्ट होण्यास, त्यांनी शिकलेल्या किंवा समकक्ष विषयान्वये परिक्षेस बसण्याची संधी देण्यात येणार आहे. (उदा: सध्या २०२४ पॅटर्न प्रमाणे नियमित व यापूर्वीच्या लगतच्या पॅटर्नप्रमाणे ज्या अनुशेष परीक्षा घेण्यात येत असतील, अशा परीक्षा)

मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, संबंधित विद्यापीठीय शैक्षणिक विभाग/ संबंधित सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये/ संबंधित सर्व संलग्नित मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे – ४११००७ )
जावक क्र. CB/33 )
दिनांक : 21 /09/2025 )

21/9/2026
(स. द. डाबखर)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी:
१. मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र–कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठीय शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
११. मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान सेवा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१२. सहायक कुलसचिव, अहिल्यानगर व नाशिक विद्यापीठ उपकेंद्र

संदर्भ : टिपणी क्र. एन/~~२३४~~ २३५, दि. १५/०९/२०२६